शासकीय सेवेतील परिविक्षा कालावधी
समाप्त करण्याबाबत - श्री. ह. म. सुर्यवंशी,
विभागीय सहाय्यक भाषा संचालक, नागपूर.

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग,
शासन निर्णय क्रमांकः- परिका-२०१८/प्र.क्र.९०/आस्था-२
नवीन प्रशासन भवन, ८ वा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक ०४.१०.२०१८.

संदर्भ :- १) मराठी भाषा विभाग, शासन निर्णय क्र. भासंसं-२०१६/प्र.क्र. ५२/आस्था-२, दि. २०.०६.२०१६
२) भाषा संचालक यांचे पत्र क्र. रापअ (नियुक्ती)-२०१६/प्र.क्र.११६/८६/चौदा, दि. २७.०८.२०१८.

शासन निर्णय :-

संदर्भ १ अन्वये श्री. ह. म. सुर्यवंशी यांची सहायक भाषा संचालक (अनुवाद व शब्दावली) गट-ब या पदावर नामनिर्देशनाने २ वर्षाचा परिविक्षा कालावधी समाधानकारकपणे पूर्ण करण्याच्या अटीवर नियुक्ती करण्यात आली होती. सदर पदावर ते दि.२४.०६.२०१६ रोजी रुजू झाले आहेत. या २ वर्षाच्या कालावधीत त्यांनी नियुक्ती आदेशातील तसेच परिविक्षा कालावधी समाधानकारकपणे पूर्ण करण्यासंबंधीचे आवश्यक निकष पूर्ण केले आहेत. या २ वर्षाच्या कालावधीमध्ये त्यांनी एकूण १५ दिवसांची रजा उपभोगली असल्याने त्यांचा परिविक्षा कालावधी तेवढ्या दिवसांनी पुढे वाढत आहे. त्यामुळे सदर पदावरील त्यांचा २ वर्षांचा परिविक्षा कालावधी दि.०८.०७.२०१८ अखेर समाधानकारकपणे पूर्ण करण्यात येत आहे व त्यांची नियुक्ती पुढे सुरु ठेवण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक **२०१८१००३१७१६०७०८३३** असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

M. P. Kudtarkar
Digitally signed by M. P. Kudtarkar
Date: 2018.10.04 13:38:21 +05'30'

(मं.प. कुडतरकर)
कार्यासन अधिकारी

प्रत,

१. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर
२. भाषा संचालक, भाषा संचालनालय, मुंबई.
३. विभागीय सहाय्यक भाषा संचालक, नागपूर.
४. कोषागार अधिकारी, नागपूर.
५. श्री. ह. म. सुर्यवंशी (भाषा संचालक, भाषा संचालनालय यांच्यामार्फत)
६. सर्व अवर सचिव/कक्ष अधिकारी, मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. निवडनस्ती.